**प्रसिध्दी पत्रक** दिनांक ३०/०८/२०२४

**आरोपी लोकसेवक**- श्री. राजेश सुदाम यादव, पद- पोलीस निरीक्षक (वर्ग-1) नेमणुक- पो.स्टे.पुंडलीकनगर, छत्रपती संभाजीनगर, 2) सुरेश बाबूसिंग पवार, पद-पोअं/1793 (वर्ग-3) नेमणुक- पो.स्टे.पुंडलीकनगर, छत्रपती संभाजीनगर यांनी तक्रारदार यांचेकडून अतिक्रमण काढण्यासाठी तक्रारदार यांना पोलीस बंदोबस्त मिळवण्यासाठी आलोसे क्रमांक-2 यांनी तक्रारदार यांचेकडून 50,000/- रुपये लाचेची मागणी करुन 50,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारल्याने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांनी पो.स्टे.पुंडलीकनगर येथे गुन्हा दाखल केला आहे.

| | | |
|---|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | :- | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे पुंडलीकनगर, गु.र.नं.337/2024 कलम 7, 7अ, 12 भ्र.प्र.अ. अन्वये छत्रपती संभाजीनगर शहर |
| आरोपी यांचे नाव व पत्ता | :- | 1) श्री. राजेश सुदाम यादव, पद- पोलीस निरीक्षक (वर्ग-1) नेमणुक- पो.स्टे.पुंडलीकनगर, छत्रपती संभाजीनगर 2) सुरेश बाबूसिंग पवार, पद-पोअं/1793 (वर्ग-3) नेमणुक- पो.स्टे.पुंडलीकनगर, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागणी रक्कम | :- | दिनांक 03/04/2024 एकुण 50,000/- रुपये लाचेची मागणी व स्विकृती. |
| लाच स्विकृती रक्कम | | 50,000/- रुपये. |
| चौकशी अधिकारी | :- | श्री. राजीव तळेकर, पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर |
| लाच मागण्याचा हेतु | :- | अतिक्रमण काढण्यसासाठी तक्रारदार यांना पोलीस बंदोबस्त मिळवण्यासाठी |
| थोडक्यात माहिती | | यातील तक्रारदार यांच्या मालकीच्या ताब्यातील मौजे गारखेडा गट क्रमांक 50/2/4 मधील जमीन क्षेत्रफळ 24000 स्क्वेअर फुट, रेणुका नगर ता.जि. छत्रपती संभाजीनगर मधील जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी तक्रारदार यांनी पोलीस बंदोबस्त मिळवण्याकरीता रीतसर अर्ज केला होता. सदरील अतिक्रमण काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त पुरविण्यासाठी आलोसे क्र. 2 यांनी तक्रारदार यांच्याकडे मागणी करुन 50,000/- रुपये लाचेची रक्कम स्विकारली. जागेचा ताबा मिळविल्यानंतर उर्वरीत 1,00,000/- रुपये साहेबांना देण्याचे ठरले व दिनांक 03/04/2024 रोजी आलोसे क्र. 2 सुरेश बाबूसिंग पवार, यांनी 50,000/- रु. स्विकारले परंतू सदरील जागेवरील अतिक्रमण काढणेबाबतचे काम न झाल्यामुळे तक्रारदार यांनी आलोसे क्र.2 पवार यांची भेट घेऊन त्यांना दिलेल्या पैशाची विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांना आलोसे क्र.1 राजेश यादव, पो.नि. यांच्या कॅबिनमध्ये घेऊन गेले व त्या ठिकाणी आलोसे क्र.1 पोलीस निरीक्षक, राजेश यादव, यांच्या समोर गेले असता, पैसे दोन टप्प्यात परत देतो असे पो.नि.राजेश यादव, तक्रारदार यांना म्हणाले. हा सर्व घटनाक्रम तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईलमध्ये स्वत: रेकॉर्डींग व चित्रीकरण संभाषणासह केले असून सदर घटनेवरुन झालेल्या चौकशी अंती नमुद आलोसे यांचे विरुध्द पो.स्टे.पुंडलीकनगर, छत्रपती संभाजीनगर येथे गु.र.नं.337/2024 कलम 7, 7अ, 12 भ्र.प्र.अ. अन्वये गुन्हा दाखल झाला आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा. संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. मुकूंद आघाव यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक, राजीव तळेकर, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाईकामी पोलीस हवालदार/ प्रकाश घुगरे, अशोक नागरगोजे व पोअं/सी.एन.बागुल, ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,

पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 9881460103

पोलीस उप अधीक्षक :- 9923247986.


30/8/2024

( सुरेश ह. माईकनवरे )
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.